एक दिवस मी चालत होतो, तेव्हा अचानक आकाशाकडून एक आवाज ऐकू आला, मी वर पाहिले तर तोच फरिश्ता (जिब्राईल अलैहिस्सलाम), जो हिरा गुहेत माझ्याकडे आले होते

हजरत अबू सलमा बिन अब्दुर्रहमान रह यांनी वर्णन केले आहे की हजरत जाबिर बिन
अब्दुल्लाह अन्सारी (रज़ि.) यांनी वहीच्या थांबण्याच्या काळाचा (फतरतुल वही) उल्लेख करताना सांगितले: <>.
[صحيح] [متفق عليه]

नबी क्रीम सल्लल्लाहु अलैही व सल्लम यांनी आपल्या पैगंबरीच्या सुरुवातीच्या काळात वही काही काळ थांबल्याचा उल्लेख केला: मी मक्केच्या रस्त्यांवर चालत होतो, तेव्हा अचानक आकाशातून आवाज आला, मी वर पाहिले तर जिब्राईल अलैहिस्सलाम, जे हिरा गुहेत माझ्याकडे आले होते, आकाश आणि पृथ्वीच्या दरम्यान एका आसनावर बसलेले दिसले, त्यांना पाहून मी घाबरलो आणि घरी परतलो व म्हटले: मला झाका. यानंतर अल्लाह तआलाने या आयाती नजिल केल्या: {हे चादर ओढून घेणाऱ्या} {उठा} दावतीच्या कार्यासाठी ज्यांनी तुमच्या रिसालतवर ईमान आणले नाही त्यांना चेतावणी द्या. आपल्या खऱ्या पालनकर्त्याची महानता जाहीर करा. आपले कपडे स्वच्छ ठेवा, अपवित्रता आणि मूर्तीपूजा सोडा, यानंतर वही (अल्लाहची प्रकटने) अधिक दृढपणे सुरू झाली आणि वाढत गेली.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/66304